# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

उपजिल्हाधिकारी कक्ष,झोपुप्रा-मुंबई.
क्र. झोपुप्रा/उजि./कार्या-2/टे/डी-2/ परिपत्रक/2014 | ६६०
दिनांक :- -4 JUL 2014

परिपत्रक क्र. १४७

विषय :-महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मुलन व पुनर्विकास), अधिनियम 1971 ची कलमे 33 व 38 सुधारीत कलम 33(अ) नुसार पात्र/अपात्र झोपडीधारकांविरुध्द कारवाई करणेबाबत.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मूलन व पुनर्विकास), अधिनियम 1971 मधील कलम 33 व 38 व सुधारीत कलम 33(अ) मधील तरतुदीनुसार प्राधिकरणाकडून क्र. झोपुप्रा/उजि/परिपत्रक/1032/2013, दि31/07/2013 नुसार परिपत्रक क्र.143 निर्गमित करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मुलन व पुनर्विकास), अधिनियम 1971 चे सुधारीत कलम 33(अ) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये असहकार करणा-या पात्र/अपात्र झोपडीधारकांच्या विरुध्द निष्कासनाच्या कार्यवाही बाबत खालील सुधारित कार्य पध्दती निश्चित करण्यात येत आहे.

**पात्र झोपडीधारकांविरुध्द करावयाची कार्यवाही.**

1) विकासक/संस्था/वास्तुविशारद यांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत किंवा प्रकल्पात सहभागी होण्यासाठी इच्छुक नसलेल्या **पात्र** झोपडपट्टी रहिवाश्यांच्या निष्कासनाच्या कार्यवाहीबाबतचे सर्व प्रस्ताव प्राधिकरणाने विहीत केलेल्या नमुन्यात सक्षम प्राधिकारी यांचेकडे खालील कागदपत्रांसह समक्ष सादर करावेत.

अ) प्रत्येक असहभागी पात्र झोपडीधारकास, योजनेत सामील झालेल्या झोपडीधारकांप्रमाणेच पुनर्वसन सदनिका / संक्रमण शिबिरात कोठे जागा/ गाळा किंवा भाडे देण्यात येणार आहे असे पात्र झोपडीधारकांना लेखी सूचना दिलेल्या पत्राची सत्यप्रत व झोपडीधाकांना सदरहू सूचना पाठविल्याची पोच पावती.

ब) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस मान्यता मिळालेले कागदपत्रे उदा.LOI, IOA.

क) झोपडीधारकांची पात्रता निश्चित केलेले परिशिष्ट-2.

D:\Santosh\santosh\Circular\Action ३३ & ३८.doc

प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-400 051.
दुरध्वनी क्र.2656800/26590405/1879, फॅक्स क्र.91-22-26590457. संकेतस्थळ: www.sra.gov.in ई-मेल : info@sra.gov.in

2) विकासक/संस्था/वास्तुविशारद यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने पात्र झोपडीधारकांविरुध्द सक्षम प्राधिकारी यांनी कलम 33अ मधील (ई) व (फ) नुसार कार्य करावी व त्यानंतर कलम 33/38 नुसार निष्कासनाची कार्यवाही करावी.

3) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या पहिल्या इमारतीस बांधकाम परवानगी मिळेपर्यंत जे पात्र झोपडीधा योजनेमध्ये सामील होत नसतील अशा झोपडीधाकांची तयार होणारी सदनिका/गाळे ताब्य घेण्यायाबाबतचा सविस्तर प्रस्ताव सक्षम प्राधिकारी यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे सा करावा.

**अपात्र झोपडीधारकांविरुध्द करावयाची कार्यवाही.**

**अपात्र** झोपडीधारकांविरुध्द निष्कासनाच्या कार्यवाही बाबतचे प्रस्ताव विकासक/ वास्तुविशारद यांनी संबंधित सक्षम प्राधिकारी यांच्या कार्यालयाकडे सादर करावेत. सक्षम प्राधिकारी यांनी कलम 33 व 38 मधील तरतुदीनुसार रितसर कार्यवाही करावी.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**

प्रत :- 1.अप्पर जिल्हाधिकारी, मुंबई शहर/मुंबई पूर्व उपनगरे/मुंबई पश्चिम उपनगरे.
2.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी/झोपुप्रा यांचे स्विय सहाय्यक.
3.सचिव/झोपुप्रा.
4.सर्व सक्षम प्राधिकारी.
5.वित्त नियंत्रक/झोपुप्रा.
6.उपमुख्य अभियंता/झोपुप्रा.
7.उपजिल्हाधिकारी/झोपुप्रा.
8.सहनिबंधक/झोपुप्रा.
9. जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख /झोपुप्रा.
10. कार्यकारी अभियंता, शहर/पूर्व/पश्चिम उपनगरे/झोपुप्रा.
11. तहसिलदार प्रशासन/झोपुप्रा.
12. सहाय्यक निबंधक/झोपुप्रा.
13. विधि सल्लगार/झोपुप्रा.
14.सहाय्यक संचालक नगर रचना/झोपुप्रा.
15.प्रशासकीय अधिकारी/झोपुप्रा.
16. माहिती तत्रज्ञान अधिकारी/झोपुप्रा.
17. जन संपर्क अधिकारी/झोपुप्रा.
18. निवड संचिका.

D:\Santosh\santosh\Circular\Action ३३ & ३८.doc